# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 144/2024 दिनांक :20.04.2024

## 1)विवाहीतेचा छळ :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 01.05.2023 ते दि. 01.01.2024 च्या दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व माहेरी ह. मु. काकांडी ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस गाडी घेण्यासाठी म्हणुन तुझे माहेरहुन 1,20,000/–रूपये घेवुन ये असे म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन त्रास दिला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 314/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.क्रं. 9823827173** हे करीत आहेत.

**2)मनाठा :–** दिनांक 01.09.2022 ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी माळबोथ ता. उमरखेड जि. यवतमाळ ह. मु. गार गव्हाण ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईचे पतीने दुसऱ्या बाई सोबत अनैतिक संबध प्रस्तापीत करून तिचे सोबत पळुन जाऊन घरातील किरकोळ भांडणावरून फिर्यादीस मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 57/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2334 यादव, मो.क्रं. 9890616197** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**हिमायतनगर :–** दिनांक 18.04.2024 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **मौ. सोनारी बसस्थानक जवळ ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संभाजी भारत कसबे, वय 24 वर्षे, रा. सोनारी ता. हिमायतनगर** यास यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील कार क्रमांक एमएच–26/सीएस–5981 ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन पाठीमागुन जोराची धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी प्रशांत भारत कसबे, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. सोनारी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं. 85/2024 कलम 279, 337, 338, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9922660412** हे करीत आहेत.

## 4)कॉपी राईट ॲक्ट :–

**वजिराबाद :–** दिनांक 18.04.2024 रोजी चे 15.45 वा. चे सुमारास, **कलामंदीर ॲक्सीस बँक समोर नारायणा स्टोअर्स डॉक्टर लेन वजिराबाद नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या हिंदुस्थान युनिलीव्हर या कंपणीचे बनावट कॉस्मेटीक प्रॉडक्ट व रेक्टकीट बेनकीझर या कंपणीचे बनावट माल किंमती 3,08,698/– व 33,590/–रू असा एकुण 3,42,288/–रू मालाची चोरटी विक्री करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी राकेश राम सावंत, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. 407 श्री साई कॉम्पलेक्स सायानी रोड प्रभादेवी मुंबई 25** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 186/2024 कलम 51, 63 कॉपी राईट ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **सपोनि/श्री मंठाळे, मो.नं. 8237703777** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 19.04.2024 रोजी चे 11.35 वा. चे सुमारास, **चंदासिंग कॉर्नर मोकळया जागेत नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या मधुर मॉर्निंग नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 1200/–रू व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2481 माधव संतुकराव गीते, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 317/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोना/2548 पवार, मो.नं. 9922504258** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**मरखेल :–** दिनांक 19.04.2024 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **मौ. कुन्मार पल्ली गावाजवळ बसस्थानकच्या बाजुला कुन्मार पल्ली ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3206, चंद्रकांत बाबुराव पांढरे ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 76/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/526 पुरी, मो.नं. 9823144893** हे करीत आहेत.

## 7)विज पडुन मृत्यु :–

**तामसा :–**दिनांक 19.04.2024 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **साहेबराव वाघमारे याचे शेतात मौ. पिंपळगाव शिवार ता. हदगांव जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे मल्लाकार्जुन हनुमंतराव माटाळकर, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. निवघा बाजार ता. हदगांव जि. नांदेड**, हे मौ. पिंपळगाव शिवारातील शेतामध्ये जात असतांना असतांना त्यांचे अंगावर अचानक विज पडुन जागीच मरण पावला. वगैरे **खबर देणार संतोष परसराम आडे, वय 48 वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील रा. पिंपळगाव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे तामसा** आ. मृ. **07**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/138 नागरगोजे, मो.नं. 9823588620** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड